MHJG210014212022

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | २१/१०/२०२२ |
| नोंदणी तारीख | : | २१/१०/२०२२ |
| निकाल तारीख | : | ०८/११/२०२४ |
| कालावधी | : | ०२ व. ००म. १८दि. |

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (न्यायालय क्र.२) यावल यांचे न्यायालयात**
(पिठासीन अधिकारी गणेश रा. कोलते)
न्यायनिर्णय घोषित दि.०८/११/२०२४
**(संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ६८३/२०२२)**
**निशाणी क्र. २४/ब**

गुन्हा नोंद क्र. ४८६/२०२१, यावल पो.स्टे., यावल.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी / तक्रारदार | | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस निरीक्षक,<br>यावल पो.स्टे., यावल. |
| अभियोगपक्षातर्फे | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती. आर. बी. देवराज |
| आरोपी | | शकील शरीफ तडवी,<br>वय – २९ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>रा. – नायगाव, ता. यावल जि. जळगांव. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | श्री. के. डी. सोनवणे |

**भाग–ब**
(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | ०३/१०/२०२१ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | ०३/१०/२०२१ |
| दोषारोप पाठविल्याचा दिनांक | :– | १०/१०/२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :– | ०७/०७/२०२३ |

| | | |
|---|---|---|
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | २४/१०/२०२४ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याचा दिनांक | :- | --- |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | ०८/११/२०२४ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | निरंक. आरोपीला निर्दोषमुक्त करण्यात येते. |

**आरोपीची माहिती**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समोयोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शकील शरीफ तडवी | आरोपीस फौ.प्र.सं. ४१(१) प्रमाणे नोटीस दिली | ०७/०७/ २०२३ | ६५(ई) मुंबई दारुबंदी कायदा, १९४९ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

**भाग - क**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)
सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/ बचाव पक्षातर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार

**अ. अभियोगपक्ष**

| सा.क्र. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | शामकांत गुलाब धनगर | फिर्यादी | २० |
| २. | किशोर सुकदेव गजरे | पंच | २२ |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अनु.क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | ०१ | दोषारोपपत्र |
| २. | ०५ | प्रतिकथन |
| ३. | २१ | फिर्याद |
| ४. | २२ | फौ. प्र. सं. कलम ३१३ प्रमाणे निवेदन |
| ४. | २३ | जप्त केलेले द्रव्याबाबत वैज्ञानिक परिक्षणाचा अहवाल. |

## न्यायनिर्णय

(दिनांक ०८/११/२०२४ रोजी घोषित)

सदरची केस आरोपीविरुध्द मुंबई दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) या गुन्ह्यासाठी न्यायचौकशीस आहे.

२. **अभियोग पक्षाची केस थोडक्यात खालील प्रमाणे आहे –**

दि.०३/१०/२०२१ रोजी १५.४५ वाजता मौजे नायगाव ता. यावल येथे आरोपी हा त्याच्या राहत्या घराच्या आडोशाला गैरकायदा गावठी हातभटटीची दारु तयार २७ लिटर चोरटी विक्री करण्याच्या इराद्याने मिळुन आला. म्हणुन फिर्यादीने रिपोर्ट दिला. तपासाअंती आरोपीविरुध्द मुंबई दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) या गुन्ह्यासाठी दोषारोप पत्र दाखल केले.

३. माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपी विरूध्द निशाणी क्र.०५ नुसार कलम ६५(ई) मुंबई दारुबंदी कायदा, १९४९ अन्वये आरोपीचे प्रतिकथन नोंदविले आहे. आरोपीला प्रतिकथन वाचून दाखविण्यात आले असता आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे सांगुन संपरीक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. अभियोग पक्षातर्फे एकुण दोन साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहीता कलम ३१३ प्रमाणेचे निवेदन

नि.२२ वर नोंदविण्यात आले.

**४.** सदर खटल्यातील दस्तऐवज व पुराव्याचे अवलोकन केले. विद्वान सहाय्यक सहकारी अभियोक्ता व आरोपीचे वकील यांचा युक्तीवाद ऐकला व खालील मुद्दे माझ्या विचाराधीन आहेत व त्याचे निष्कर्ष मी पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दि.०३/१०/२०२१ रोजी १५.४५ वाजता मौजे नायगाव ता. यावल येथे आरोपी हा त्याच्या राहत्या घराच्या आडोशाला गैरकायदा गावठी हातभटटीची दारु तयार २७ लिटर चोरटी विक्री करण्याच्या इराद्याने मिळुन आला व त्याद्वारे आरोपीने मुंबई दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केला ? | **...नाही.** |
| २. | काय आदेश ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**५.** आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षाने फिर्यादी, शामकांत गुलाब धनगर यांना निशाणी क्र.२० वर व पंच किशोर सुकदेव गजरे यांना निशाणी क्र.२२ वर अन्वये तपासले आहे. आरोपीविरुध्द गुन्हादर्शक पुरावा आल्यामुळे त्याचा फौजदारी प्रक्रिया संहीता कलम ३१३ अन्वयेचे निवेदन नि.क्र.२२ वर नोंदविण्यात आले.

**<u>मुद्दा क्र. १ करीता</u> –**

६. अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे दि.०३/१०/२०२१ रोजी १५.४५ वाजता मौजे नायगाव ता. यावल येथे आरोपी हा त्याच्या राहत्या घराच्या आडोशाला गैरकायदा गावठी हातभटटीची दारु तयार २७ लिटर चोरटी विक्री करण्याच्या इराद्याने मिळुन आला हे सिध्द करणे गरजेचे आहे. त्यामुळे तपासण्यात आलेल्या पंच साक्षीदाराची साक्ष बारकाईने तपासावी लागेल.

७. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ शामकांत गुलाब धनगर, फिर्यादी यांच्या साक्षीत असे आले आहे की, दि. ०३/१०/२०२१ रोजी यावल पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत असतांना त्यांच्या पोलीस स्टेशनला गुप्त माहीतीद्वारे आरोपी हा गावठी हातभटटीची दारुची चोरटी विक्री करीत आहे. पोलीस कर्मचारी व पंच हे घटनास्थळी गेले असता त्यांनी आरोपीच्या ताब्यातुन २७ लिटर गावठी हातभटटीची दारू जप्त केली व उर्वरीत मुद्देमाल जागीच नाश केला. पोलीस स्टेशनला येवुन आरोपी विरूद्ध फिर्याद दाखल केली. त्यांनी उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, ते ज्या वाहनाने घटनास्थळावर गेले त्या वाहनाचा वाहन क्रमांक फिर्यादमध्ये व पंचनाम्यामध्ये नमुद केलेला नाही.

८. साक्षीदार पंच किशोर सुकदेव गजरे(स.सा.क्र.२) याने पोलीसांनी त्याला दि. ०३/१०/२०२१ रोजी पोलीसांसोबत छापा टाकण्यासाठी कुठेही गेलो नव्हतो. त्याने फक्त पंचनाम्यावरील सही मान्य केली. परंतू, त्यातील मजकुर त्याला माहीत नसल्याचे त्याने कथन केल्याने त्याला भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार तपासण्यात आले. परंतु, अभियोग पक्षास मदत होईल असे काहीही त्याच्या पुराव्यात आले नाही. तथापी, पंच साक्षीदार किशोर सुकदेव गजरे(स.सा.क्र.१) याने पोलीसांनी त्याला फक्त पंचनाम्यावर सही करण्याचे सांगितले असल्याचे कथन केले आहे. म्हणुन सदर साक्षीदार हा विश्वासार्ह नाही तसेच पंचनामा संशयापलीकडे सिध्द झाल्याचे म्हणता येत नाही. त्यामुळे त्याचा पुरावा

अभियोग पक्षास उपयुक्त ठरत नाही.

९. अभियोग पक्षाने जप्त केलेले द्रव्याबाबत वैज्ञानिक परिक्षणाचा अहवाल (निशाणी क्र.२३) दाखल केलेला असला तरी सदर द्रव्य हे आरोपीच्या ताब्यातून जप्त केले होते आणि तेच द्रव्य रासायनिक विश्लेषणासाठी त्याचेमध्ये कोणतीही फेरफार न होता तत्परतेने पाठविण्यात आले होते ही बाब सिध्द झाली नाही. शिवाय वैज्ञानिक परिक्षणाकरीता द्रव्य वाहून नेणा–या सॅम्पल कॅरीअर या साक्षीदाराची साक्ष अभियोग पक्षाने नोंदविलेली नाही.

१०. अभियोग पक्षाने तपासी अंमलदार व इतर स्वतंत्र साक्षीदारांची साक्ष नोंदविलेली नाही. पंच साक्षीदाराने अभियोग पक्षास पुरक अशी साक्ष दिलेली नाही. त्यामुळे स्वतंत्र पंच साक्षीदाराने पुरक अशी साक्ष न दिल्यामुळे गावठी हात भट्टीची दारु घटनास्थळावरुन संशयाच्या पलीकडे जावून जप्त करण्यात आली हे सिध्द होत नाही. या कारणास्तव अभियोग पक्षातर्फे आरोपीविरुध्द मुंबई दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) नुसारचा गुन्हा सिध्द झाला नाही. म्हणुन मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

<u>मुद्दा क्र.२ करीता</u> –

११. वरील पुराव्याचे अवलोकन केले असता व मुद्द क्र.१ चा निष्कर्श नकारार्थी नोंदविल्याने तसेच अभियोग पक्षातर्फे आरोपीविरुध्दचा आरोप संशयापलीकडे सिध्द न झाल्याने आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतो. म्हणुन मी खालील आदेश पारीत करीत आहे –

## <u>आदेश</u>

१. आरोपी **शकील शरीफ तडवी** याला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १९७३ चे कलम २५५(१) अन्वये मुंबई दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) या गुन्ह्यातुन मुक्त करण्यात आले.

२. आरोपीचे जमानतीकरीता सादर केलेले बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. मुद्देमाल आधीच नाश केला असल्यामुळे पुढील आदेश करण्यात येत नाही.

४. आरोपीला आदेशीत करण्यात येते की, या न्यायनिर्णयाचे विरुध्द अपिल झाल्यास अपील न्यायालयात हजर राहण्याबददलची अपिल नोटीस मिळेपर्यंत रुपये १५,०००/– चा जमानती बंधपत्र कलम ४३७–अ फौजदारी प्रक्रिया संहिता नुसार दाखल करावेत.

५. सदर न्यायनिर्णयाची प्रत मा. जिल्हाधिकारी, जळगांव यांच्याकडे माहितीस्तव पाठविण्यात यावी.

***न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.***

GANESH RAJESH KOLTE
Digitally signed by GANESH RAJESH KOLTE
Date: 2024.11.11 11:42:29 +0530

**(गणेश रा. कोलते)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.२), यावल.

दि.०८/११/२०२४.